वि. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, वाशिम यांचे कार्यालय

विषय :- 'ऑफीस टेबल, प्लॉस्टीक खुर्च्या, लोखंडी कपाट व लोखंडी रॅक' खरेदी करणेकरीता दरपत्रक मागविण्याबाबत.

जिल्हा न्यायालय, वाशिम या न्यायिक जिल्ह्यातील कारंजा येथे दिनांक २४/०८/२०२५ रोजी दिवाणी न्यायालय (व-स्तर) कारंजा हे नविन न्यायालय स्थापन होणार आहे. नविन न्यायालयाकरीता दिवाणी प्रकरणे ठेवण्याकरीता पाच कप्पे व लॉक असलेले १८, २० व २२ गेज चे लोखंडी कपाट, पाच कप्पे असलेले १८, २० व २२ गेज चे लोखंडी रॅक, ड्रॉवर व लॉक असलेले ऑफीस टेबल व प्लॉस्टीक खुर्च्या स्थानिक बाजारपेठेतुन खरेदी करण्याकरीता खालील अटी व शर्तींवर दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

१. खरेदी केलेल्या वस्तुचा पूरवठा, आदेश दिल्यापासून त्वरीत/०२ (दोन) दिवसांचे आत करणे बंधनकारक राहील.
२. खरेदी करण्यात आलेल्या वस्तूंच्या पुरवठयाची पाहणी जिल्हा न्यायालय, वाशिम येथे करण्यात आल्यानंतर सदरहु वस्तुंचा पुरवठा दिवाणी न्यायालय (व-स्तर) कारंजा या न्यायालयात पुरवठा करणे बंधनकारक राहील.
३. पुरवठा करण्यात आलेल्या वस्तुंमध्ये काही त्रुटी आढळल्यास सदरच्या त्रुटी असलेली/असलेल्या वस्तू तात्काळ बदलवून देणे अनिवार्य राहील.
४. खरेदी केलेल्या वस्तुंचे देयकाचे प्रदान हे अदाता नोंदणी पदधतीद्वारे सरळ अदात्याचे बॅक खात्यात जमा करण्यात येईल.

दरपत्रक धारकाने वरीलप्रमाणे पाच कप्पे व लॉक असलेले १८, २० व २२ गेज चे लोखंडी कपाट, पाच कप्पे असलेले १८, २० व २२ गेज चे लोखंडी रॅक, ड्रॉवर व लॉक असलेले ऑफीस टेबल व प्लॉस्टीक खुर्च्या स्थानिक बाजारपेठेतुन खरेदी करणेकरीता आपले दरपत्रक सर्व कर, किंमती व अटीसह दिनांक २०/०८/२०२५ रोजी किंवा तत्पुर्वी वि. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, वाशिम यांचे नांवे या कार्यालयास बंद लिफाफयामध्ये सादर करावे. तसेच बंद लिफाफयावर **'ऑफीस टेबल, प्लॉस्टीक खुर्च्या, लोखंडी कपाट व लोखंडी रॅक'** खेरदी असे ठळक अक्षरात नमुद करावे.

तसेच प्राप्त झालेले दरपत्रके कोणतेही कारण न दाखविता नामंजूर करण्याचा अधिकार मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, वाशिम यांना राहील.

आदेशावरून,

दिनांक :१३/०८/२०२५

प्रबंधक,
जिल्हा न्यायालय, वाशिम.